सन २०१७-१८ मध्ये केंद्र शासन पुरस्कृत योजनेसाठी राज्य शासनाचा हिस्सा याखालील अनुदानातून महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास सागरमाला योजनेअंतर्गत ८ जेट्टींसाठी पर्यटन विभागाचा हिस्सा म्हणून निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,
शासन निर्णय, क्रमांक : टीडीसी-२०१८/३/प्र.क्र.२५४/ पर्यटन,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : २० मार्च, २०१८.

वाचा : व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई यांचे पत्र क्र.मपविम/ साक्री/ जेट्टी/अ-१७१/२०१८, दि.१३/३/२०१८.

प्रस्तावना:

केंद्र शासनाच्या सागरमाला योजनेअंतर्गत राज्यातील विविध पर्यटनस्थळी जेट्टी उभारण्यात येणार असून या जेट्टींसाठी सागरमाला योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून ५०% निधी दि.३१ मार्च, २०१८ अखेर राज्य शासनास प्राप्त होणार असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांनी व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई यांच्या समवेत दि.१३/३/२०१८ रोजी झालेल्या बैठकीत नमूद केले होते. त्यानुसार राज्यात एकुण २३ ठिकाणी जेट्टी उभारण्याचे प्रस्तावित असून त्यापैकी १२ ठिकाणी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या जेट्टी उपलब्ध आहेत. उर्वरित ११ जेट्टींपैकी ८ जेट्टी पर्यटनक्षमस्थळी असून या जेट्टी व त्यास केंद्राकडून प्राप्त होणारा निधी, तसेच उर्वरित राज्य शासनाच्या हिश्श्यापैकी जिल्हा प्रशासनाकडून मिळणारा निधी व पर्यटन विभागामार्फत उपलब्ध करुन द्यावयाचा निधी याबाबतचा तपशिल महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई यांनी संदर्भाधिन पत्रान्वये सादर केला आहे. त्यानुसार सदर प्रस्तावास पर्यटन विभागामार्फत उपलब्ध करुन द्यावयाच्या निधीच्या अनुषंगाने प्रशासकीय मान्यता देऊन त्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात मागणी क्र. झेडडी-४, मुख्यलेखाशिर्ष "३४५२ १९०२" याखाली केंद्र शासन पुरस्कृत योजनेसाठी राज्य शासनाचा हिस्सा याखाली रुपये ४०००.०० लक्ष इतकी तरतूद केलेली असून त्यापैकी ८०% म्हणजे रुपये रुपये ३२००.०० लक्ष वितरणास उपलब्ध आहे. त्यामधून रु.१९८९.०० लक्ष एवढी रक्कम आतापर्यंत वितरीत करण्यात आली आहे. उर्वरित रु.१२११.०० लक्ष एवढ्या तरतूदीमधून रु.४००.०० लक्ष- (रूपये चारशे लक्ष फक्त) एवढा निधी खालील तक्त्यात नमूद केलेल्या ८ ठिकाणी सागरमाला योजनेअंतर्गत जेट्टी उभारण्यासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास उपलब्ध करुन देण्यास या शासन निर्णयाव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

(रु.कोटीत)

अ.क्र.	बंदराचे ठिकाण व जिल्हा	एकूण किंमत	केंद्राकडून सागरमाला योजनेअंतर्गत उपलब्ध होणारा निधी	राज्य शासनाच्या हिस्स्यापैकी जिल्हा प्रशासनाकडून मागणी करण्यात येणारा निधी	पर्यटन विभागामार्फत प्रस्तावित असलेला एकूण निधी	रकाना ६ २०१७-१८ मध्ये द्यायचा निधी
१	२	३	४	५	६	७
१	उंदेरी, रायगड	९.१२	४.५६	१.८२	२.७४	०.५०
२	दिवेआगार, रायगड	८.४८	४.२४	१.७०	२.५४	०.५०
३	पद्यादुर्ग, रायगड	८.३०	४.१५	१.६५	२.५०	०.५०
४	वेलदुर, रत्नागिरी	७.९९	३.९९५	१.६०	२.४०	०.५०
५	सुवर्णदुर्ग, रत्नागिरी	८.८०	४.४०	१.७५	२.६५	०.५०
६	गुहागर, रत्नागिरी	८.४६	४.२३	१.६९	२.५४	०.५०
७	दुर्गाडी, ठाणे	९.१२	४.५६	३.००	१.५६	०.५०
८	चिऊला, सिंधुदुर्ग	९.४६	४.७६	३.००	१.७३	०.५०
	एकूण				**१८.६६**	**४.००**

२. प्रमाणित करण्यात येते की, वित्त विभाग

अ.क्र.	**परिपत्रकातील परिच्छेद क्र.**	**विषय**	**विभागाचे अभिप्राय**
१	७-अ	एखाद्या योजनेस / प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देणे	प्रशासकीय विभाग असलेल्या अधिकाराअंतर्गत प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.
२	७-ब	अर्थसंकल्पिय तरतूद करणे आवश्यक असते (योजनांतर्गत नियतव्यय उपलब्ध) व अर्थसंकल्पित करणे	अर्थसंकल्पीय तरतूद उपलब्ध आहे.
३	८	प्रशासकीय विभागांना वित्तीय अधिकार नियम पुस्तिका भाग-१ वित्त विभाग शासन निर्णय क्र.विअप्र-१०.०८/प्र.क्र.७०/विनियम,दि.१५/५/२००९ अन्वये अधिकार असणे	वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग पहिला,उप विभाग एक अ.क्र. २७ नियम क्र. १४९ नुसार प्रशासकीय विभागांला पुर्ण अधिकार आहे. तसेच वित्त विभाग, परिपत्रक, दिनांक २०.४.२०१६ अन्वये विभागास अधिकार प्रदान केलेले आहेत.

४	९	विविध शासकीय / प्रशासकीय संस्थांना तसेच अनुदानित संस्थांना सहायक अनुदाने मंजूर करण्यापूर्वी त्यांचेकडून पूर्वी खर्च केलेल्या अनुदानाची अपयोगिता प्रमाणपत्रे प्राप्त करुन घेणे	या कामांना पुर्वी निधी वितरीत केलेला नाही.
५	१०	विभागाद्वारे संक्षिप्त देयकाद्वारे निधी खर्च करण्यात येतो. त्याचे तपशीलवर देयक सादर न केल्यामुळे लेखा आक्षेप येतात व अपहार संभवतात.	संक्षिप्त देयकाद्वारे निधी काढण्यात येत नाही.
६	११	स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदाने	लागू नाही.
७	१२	वैयक्तिक लाभर्थीच्या योजनेची देयके	लागू नाही.
८	१३	शिष्यवृत्ती / शिक्षणशुल्काची प्रतिपूर्ती, वैयक्ति काभार्थी यांच प्रदाने	लागू नाही.
९	१४	बांधकाम विषयक प्रस्तावासंदर्भात प्र.मा./तां.मा. तसेच आवश्यक तेथे सचिव समितीची मान्यता	प्रशासकीय मान्यता या शासन आदेशान्वये देण्यात आली आहे. सचिव समितीचे प्रकरण नाही.
१०	१५	दुय्यम कार्यालयांना खरेदी करण्यासाठी प्राधिकृत करण्याचा शासन निर्णय निर्गमित करण्यापूर्वी अशा खरेदीसाठी रितसर प्रशासकीय मान्यतेचे आदेश काढण्यात यावेत	खरेदी नसल्याने लागू नाही.
११	१६	साहित्य खरेदीची प्रक्रिया पुर्ण करुन पुरवठादार निश्चित झाल्याशिवाय खरेदीची देयके कोषागारातून आहरित करण्यात येऊ नये.	लागू नाही.
१२	१७	विविध करणांमुळे अखर्चित राहिलेला निधी विभागांची त्यांच्या अधिनस्त महामंडळाकडे हस्तांतरीत करुन तांत्रिकद्दष्टया खर्च झाल्याचे दाखविले जाते.	लागू नाही.
१३	१८	विभागांमार्फत करण्यात येणारे संगणकीकरण संदर्भातील खर्च शासनाचे दरपत्रकानुसार/निविदाद्वारे करण्यात यावा.	लागू नाही.

३. तसेच वित्त विभाग, परिपत्रक क्रमांक- अर्थसं-२०१६/प्र.क्र. ८९/अर्थ-३, दिनांक २०.४.२०१६ च्या परिशिष्टामधील तपासणी सूचीतील अ.क्र. १,२ व ३ ची पूर्तता करण्यात आली आहे. अनुक्रमांक ४ बाबत स्पष्ट करण्यात येते की, लेखापरीक्षक/महालेखापाल यांचे कोणतेही गंभीर आक्षेप नाहीत. यापुर्वी वितरीत केलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले आहेत.

४. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.३४/कोषा.प्रशा-५, दि.२४/७/२०१५ अन्वये दिलेल्या सुचनेनुसार खालीलप्रमाणे प्रमाणित करण्यात येत आहे.

तपासणी सूची	पर्यटन विभागाचे अभिप्राय
योजनेस प्रशासकीय मान्यता	प्रस्तावित निधीच्या अनुषंगाने प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.
निधी वितरण शासन निर्णयातील अटी व शर्तीचे पुर्तता झाल्यानंतरच होणार आहे.	होय.
३ महिन्यापूर्वी वितरीत केलेल्या निधीपैकी ७५% खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र	पूर्वी निधी वितरीत केलेला नाही. त्यामुळे लागू नाही.
यापूर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने लेखापरीक्षक / महालेखापाल यांच्याकडून कोणतेही गंभीर आक्षेप नाहीत.	नाही.
निधी लाभार्थ्यांच्या थेट खात्यात जमा होणार आहे.	लागू नाही.
वस्तु खरेदी करण्यापूर्वी नियमित वापरात येणा-या वस्तुंच्या बाबतीत त्याचे रितसर खरेदी नियोजन (Procurement plan) करावे व अकारण शिल्लक साठा (inventary) असून नये.	लागू नाही. ही वस्तु खरेदी नाही.
भांडवली वस्तु खरेदी करण्यापूर्वी यापूर्वी खरेदी केलेल्या अशा वस्तुंची यथास्थित नोदं dead Stock रजिस्टर मध्ये घेण्यात आली असून त्याचा योग्य वापर झाला असून त्या पडून नाहीत, असे प्रमाणपत्र.	भांडवली वस्तु खरेदीचे प्रकरण नाही. लागू नाही.
यामधून खरेदी होणार असल्यास प्रत्यक्ष वस्तु प्राप्त झाल्यानंतरच संबंधितांना देयक अदा केले जाणार आहे.	ही वस्तु खरेदी नाही.
आवश्यक त्या ठिकाणी आदिवासी / सामाजिक न्याय विभाग यांची निधी वितरणास सहमती आहे.	आदिवासी विकास विभाग व सामाजिक न्याय विभागाचा संबंध नाही.
प्रस्तुत योजनेत कोणतेही १ वर्ष जुने संक्षिप्त देयक त्याच लेखाशीर्षाखाली प्रलंबित नाही.	कोणतेही संक्षिप्त देयक प्रलंबित नाही
निधी स्वीय प्रपंची लेखा अथवा बँक खात्यात जमा न करता खर्च केला जाणार आहे.-	नाही. तथापि संबंधित कार्यान्वयिन यंत्रणेस निधी वितरीत करण्यात येतो.

अटी व शर्ती :-

१) ही मान्यता या ठिकाणी जागतिक स्तरावरच्या सुविधा निर्माण करणे व महाराष्ट्र मेरी टाईम बोर्डाशी या जेट्टीसंदर्भात योग्य तो करार करण्याच्या अधिन देण्यात येत आहे.

२)वितरीत केलेल्या निधीतून खर्च करताना वित्तीय नियमांचे आणि विविध नियमांतर्गत नेमून दिलेल्या कार्यपध्दतीचे पालन करण्यात यावे.

३) कोणत्याही परिस्थितीत मंजूर अनुदानापेक्षा जास्त खर्च होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. मंजूर अनुदानापेक्षा जादा खर्च झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित जिल्हधिकारी यांची राहील व जादा खर्च प्रित्यर्थ जादा अनुदान उपलब्ध करुन दिले जाणार नाही. तसेच कार्यान्वयीन यंत्रणा पूर्वीच्या आदेशात नमूद केल्या प्रमाणेच राहील.

४) मंजूर तरतुदीतून करावयाचा खर्च ३१ मार्च, २०१८ पर्यंत करण्यात यावा व मंजूर कामे तात्काळ पूर्ण करावीत.

५) पर्यटन विभागाने केलेल्या कामाच्या ठिकाणी पर्यटन विभागाचे माहिती फलक लावण्यात यावेत.

६) ज्या संदर्भात निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे त्या प्रत्येक योजनेच्या संदर्भात वित्तीय अधिकाराच्या प्रत्यावर्तनानुसार सक्षम प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेणे आवश्यक आहे.

७) अशा प्रत्येक योजनेबाबत करावयाच्या बांधकामासंदर्भात अथवा खरेदीबाबत किंवा सेवा पुरवठा कराराबाबत वित्तीय नियमांप्रमाणे आवश्यक ती कार्यपध्दती पाळणे आवश्यक आहे. या संदर्भात शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक-संकीर्ण-१००२/प्र.क्र.१५/कोषा-प्र ५, दि. ६ फेब्रुवारी, २००२ च्या सूचनांचे काटेकोरपणे पालन होईल याची खबरदारी संबंधित अंमलबजावणी यंत्रणेने घ्यावी. तसेच शासन निर्णय वित्त विभाग क्र.बीजीटी-१०.००/प्र.क्र.५६/२०००/वित्तीय सुधारणा, दिनांक १०.९.२००१ मधील उपाययोजनांची अंमलबजावणी तंतोतंतपणे करण्यात यावी.

८) तांत्रिक मान्यता विहित स्तरावर घेण्यात यावी.

९) रस्त्यांच्या प्रस्तावित कामांच्या प्रकरणांमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियमावलीचे पालन करणे बंधनकारक राहील.

१०) योजनेत्तर स्वरुपाच्या कामासाठी (देखभाल/दुरुस्ती इ.) सदरची तरतूद उपयोगात आणली जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

११) सदर कामांपैकी जी कामे तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी प्रस्तावित करुन देवस्थान/संस्थेच्या जागेवर करण्यात येणार आहेत अशा कामांसंदर्भात सदर देवस्थान/संस्थेकडून ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील. तसेच अशा कामाच्या पूर्णत्वानंतर त्या संदर्भातील देखभाल/दुरुस्ती, संबंधित संस्थेने करण्यासंदर्भात जिल्हाधिका-यांनी संबंधित देवस्थान / संस्थेबरोबर करारनामा करणे बंधनकारक राहील. अशा प्रकारच्या देखभाल दुरुस्तीकरीता शासनाकडून यापुढे कोणत्याही प्रकारचा निधी उपलब्ध करुन दिला जाणार नाही, याची नोंद घेण्यात यावी व तशी अट करारात अंतर्भूत करण्यात यावी. तसेच या कामामुळे निर्माण होणाऱ्या सर्व सुविधा तसेच पर्यटन स्थळ सर्व नागरीकांसाठी खुले राहील, अशी अट करारात समाविष्ट करण्यात यावी.

१२) सदर निधीतून होणाऱ्या खर्चातून करावयाच्या कामांची भौतिक प्रगती तसेच निधीतून होणा-या खर्चाची मासिक विवरणपत्रे दर महिन्याच्या १० तारखेपर्यंत शासनास व महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास न चुकता सादर करावीत. तसेच काम पूर्ण झाल्यानंतर पूर्णत्वाचा दाखला आणि निधीबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र न चुकता शासनास व महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास सादर करण्यात यावे.

१३) सदर काम पूर्ण झाल्यानंतर सदर कामाच्या देखभालाची तसेच इतर अनुषंगिक कामांची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम व संबंधित संस्था यांची राहील.

५. वर नमूद करण्यात आलेला खर्च हा सन २०१७-१८ या वर्षाच्या अर्थसंकल्पीय तरतूदीमधून मुख्यलेखाशीर्ष **"मागणी क्रमांक झेडडी-४, ३४५२-पर्यटन, (०२) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना- राज्य योजनांतर्गत योजना, (०२)(०१) केंद्रीय अर्थसहाय्य अंतर्गत करण्यात येणाऱ्या पर्यटनस्थळ विकासासाठी राज्य शासनाचे सहायक अनुदान (३४५२ १९०२), ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर)"** या लेखा शिर्षाखाली मंजुर तरतूदीमधून भागविण्यात यावा. या आदेशान्वये मंजूर करण्यात आलेली सहायक अनुदानाची रक्कम आहरीत करुन संबंधितांना वितरीत करण्याकरीता श्री. र.ल.लखोटे, कार्यासन अधिकारी, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून व श्री.अ.ई.ई. शेख, उप सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी वरील निर्णयानुसार मंजूर करण्यात आलेल्या सहायक अनुदानाची रक्कम अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई येथून आहरित करुन महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास वितरीत करण्याची कार्यवाही करावी. सदर निधी "कक्ष अधिकारी, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई." (Desk Officer, Tourism and Cultural Department, Mantralaya, MUMBAI) या नावे E.C.S. व्दारे उपलब्ध करुन देण्यात यावा."

६. हा शासन निर्णय, वित्त विभाग परिपत्रक क्र.अर्थस-२०१६/प्र.क्र.८९/अर्थ-३, दि.२०/४/२०१६ व दि.८/२/२०१७ तसेच वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग- पहिला, उप विभाग एक अ.क्र.२७ नियम क्र.१४९ प्रशासकीय विभागांना दिलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा सकेतांक २०१८०३२११८१२०२७५२३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Ravindra Laxmikant Lakhote

Digitally signed by Ravindra Laxmikant Lakhote
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tourism And Cultural Affairs Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ae5e5678dc8c9d9c01f7043448a53f6a9fbe81e46d183af43c9a9e01eb42c7c7, serialNumber=93c11f919f0c5fba6953b4841cc8cfd46b2b788da139e3f21b3d79d2cf976efa, cn=Ravindra Laxmikant Lakhote
Date: 2018.03.21 18:14:48 +05'30'

(र. ल. लखोटे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. महालेखापाल, महाराष्ट्र - १, (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
२. महालेखापाल, महाराष्ट्र - २, (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), नागपूर
३. महालेखापाल, (स्थानिक निकाय लेखापरीक्षा व लेखा), मुंबई.
४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई.
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
६. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
७. नियोजन विभाग (कार्यासन-१४११/१४४४), मंत्रालय, मुंबई.
८. वित्त विभाग (का.व्यय-१४/अर्थोपाय / अर्थसंकल्प) मंत्रालय, मुंबई.
९. अवर सचिव, (अर्थसंकल्प शाखा) पर्यटन व सांस्कृतिक विभाग,मंत्रालय, मुंबई.
१०. निवड नस्ती, कार्यासन-पर्यटन.